## नियमीत दिवाणी मुकदमा नं. २८/२०१८ मधील निशाण १६५ वरील आदेश

CNR: MHSI05-000253-2018

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र. ३ तर्फे त्याचे विरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्दबातल करण्यासाठी दाखल केला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, त्यांनी आपले वकिल बदलल्याने वकीलांना माहिती देणेस व कागदपत्रे पुरविणेस बराच कालावधी गेल्यामुळे योग्य मुदतीत कैफियत सादर करता आलेली नाही. सदरचा 'विना कैफियत' आदेश रद्द न झाल्यास त्यांचे न्याय हक्कांवर गदा येवून त्यांचे पैशाचे स्वरुपात कधीही भरुन न येणारे असे अतोनात नुकसान होणारे आहे. सबब, प्रतिवादी क्र. ३ यांचे विरुध्द झालेला 'विना कैफियत' आदेश रद्द करुन कैफियत स्विकारण्यात यावी अशी मागणी सदर प्रतिवादीने केली आहे. या अर्जावरच वादीने आपले म्हणणे दिलेले असून, त्याने असे कथन केले आहे की सदरचा अर्ज खोडसाळ असून तो मान्य नाही. अर्जातील कारण हे संयुक्तीक नाही. सबब, अर्ज फेटाळावा अशी मागणी प्रतिवादीने केली आहे.

२. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. एकंदरीत नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता प्रतिवादीला त्याचे म्हणणे मांडायला देणे गरजेचे आहे असे मला वाटते. सबब, प्रतिवादी क्र. ३ यांना त्यांचे म्हणणे सादर करण्याची संधी दयायला हवी. तसे न केल्यास त्यांना त्यांची बाजु मांडण्यापासुन वंचीत ठेवल्यासारखे होईल. सबब एकंदरीत परिस्थितीमध्ये न्यायाचा हेतुस्तव मी खालील आदेश पारित करतो.

१. प्रतिवादी क्र. ३ यांचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.३ विरुध्द झालेला 'विना कैफियत' आदेश रद्दबातल करण्यात येत आहे.

सही/—

दिनांक— २२/८/२०१९

विनायक द. पाटील

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.